# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ०३/०९/२०१९

| **पो.स्टेशन/अप.क्र./कलम** | **घटनास्थळ/घटना ता.वेळ** | **फिर्यादी व आरोपीतांचे  नाव** |
|---|---|---|
| आष्टी अप. क्र.११०/२०१९ कलम ६५(ई),८३ महा. दारुबंदि अधि. | मौजा मुधोली पो.स्टे आष्टी<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक ३०.०८.२०१९ चे १४.०० ते  १५.३० वा.पर्यत | सरकार तर्फे :- सपोनि/ विक्रांत सगणे नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>**पाहिजे आरोपीतांचे नाव :-**<br>१. **आषिश उध्दव आत्राम रा. मुधोली ता. चामोर्शी जि. गडचिरोली**<br>२. **अमीत लक्ष्मन गोटपत्तीवार रा.जैरामपुर ता. चामोर्शी** |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | सहा. पोलीस निरीक्षक विक्रात सगणे,सफौ/ दादाजी करकाडे, सफौ/गंगाधर भोयर मपोहवा/शांता कुळसंगे, चापोना/रमेश ताकसांडे स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली | |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हयातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेश तसेच सिमावर्ती गोंदिया, भंडारा, तसेच नागपुर जिल्हयातील अनुज्ञाप्तीधारक दारु विक्री दुकाणातुन दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असतात, अशा अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक ३०.०८.२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास अवैध दारु विक्री संबधात गोपनिय सुत्रांकडुन मिळालेल्या माहितीचे आधारे मा. श्री. डॉ मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) तसेच पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी यांना माहिती सांगुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वर नमुद पोलीस पथक हे मौजा मुधोली चक-२ ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली येथील अवैध दारु विक्रेता याचे राहाते घरी पोहचुन अवैध दारु संबधात झडती घेतली असता, त्याचे ताब्यात **एकुन २०००००/- रुपये किमंतीचा देशी दारुच्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या एकुन २५००/- सिलबंद निपा** मिळुन आल्यात. घटनास्थळावरुन जप्ती केलेल्या दारुचे मुद्देमालासंबधात चौकशी केली असता, नमुद आरोपीचे राहाते घरी मिळुन आलेला देशी दारुचा माल हा मौजा जैरामपुर येथील ठोक दारु पुरवठा करणारा इसम नामे अमित लक्ष्मन गोटपत्तीवार यांने त्याचे मालकिचे चारचाकी वाहनाने मौजा मुधोली येथील नमुद दारु विक्रेत्यांचे राहाते घरी घरपोच पुरवठा करुन दिला असल्याचे समजले. तरी यातील नमुद दारु विक्रेता तसेच दारुचा पुरवठा करणारा ठोक दारु विक्रेता यांचे विरुध्द पोलीस स्टेशन आष्टी येथे दिनांक ३०.०८.२०१९ रोजी अपराध क्रमांक ११०/२०१९ कलम ६५ (ई),८३ महाराष्ट्र दारुबंदि अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकाचे प्रभावी कारवाई मुळे आगामी पोळा सनाचे निमीत्ताने अवैध दारु विक्रि करणारे तसेच बेकायेशिर रित्या दारुची वाहतुक करणा-या लोकांचे धाबे दणानले आहेत.




LONG
TIME
03.09.2019 13:55

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ०३/०९/२०१९

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| गडचिरोली अप. क्र.४०५/२०१७ कलम ४२०,४०६,४०९,१२०(ब) ३४ भादवि सहकलम ३६,७४,७५,४४७ द कंपनी ॲक्ट सहकलम ३,४ एम.पी.आय.डी | मौजा गडचिरोली<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक ११.११.२०११ ते माहे जानेवारी २०१७ दरम्यान<br>**दाखल ता. वेळ :-**<br>दिनाक २०.०७.२०१७ | राजेंद्र देवराव नंदनवार रा. गट्टा (फु) ता. धानोरा जिल्हा गडचिरोली **पाहिजे आरोपीतांचे नाव :-**<br>१. राजेंद्रकरण शंकरलाल राजपुत<br>२. विनोदकुमार जमनाप्रसाद शंखवार<br>३. जगदिश बिश्वास तसेच सुविधा फारमींग ॲन्ड अलाईड कंपनीमधील मुख्य अभिकर्ता<br>**अटक आरोपीतांचे पुर्ण नाव पत्ता**<br>१. परदेशीराम सिरमुराम साहु वय ४० वर्षे रा. गौतम विहार कॉलनी रायुपर (छ.ग.)<br>२. रजनिश सुभाषचंद्र दत्ता वय ३८ वर्षे रा. सुभाषनगर दिल्ली |

| माहिती कशी प्राप्त झाली | आरोपी अटक कार्यवाही दरम्यान सक्रिय अधिकारी/कर्मचारी |
|---|---|
| गुन्हयाचे तपासा दरम्यान | उल्हास पी. भुसारी, पोलीस निरीक्षक,सफौ/ दादाजी करकाडे, पोहवा/भाऊराव बोरकर, पोहवा/नरेश सहारे, स्था. गु. शा. पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली |

दिनांक ११.११.२०११ ते माहे जानेवारी/२०१७ दरम्यान सुविधा फारमींग ॲन्ड अलाईड कंपणी मुख्य शाखा भोपाल चे संचालक नामे विनोदकुमार जमनाप्रसाद शंखवार २. राजेंद्रकरण शंकरलाल राजपुत दोन्ही रा. देहरादुन (उत्तराखंड) यांनी मौजा गडचिरोली येथील बट्टुवार कॉप्लेक्स मध्ये भाडयाची खोली घेवुन त्या ठिकाणी कंपणीची शाखा स्थापन करुन अभिकर्ताच्या मार्फतीने गडचिरोली जिल्हयातील ठेवीदारांकडुन मोठया प्रमाणात रकमा गोळा करुन ठेवीदारांना कमी कालावधीत जास्त कमीशन देण्याचे आमीष दाखवुन ठेवी ठेवण्यास अप्रामाणीकपणाने प्रोत्साहित करुन ठेवींचे हितसंबधाचे रक्षण न करता तसेच ठेवीदारांच्या ठेवीमधुन फायदा होईल असे कोणतीही योजना व्यवस्था न करीता नियोजनपुर्वक संगणमताने कट रचुन, समान उद्देशाकरीता कंपणी कायदयाचे पालन न करता, सदर योजना राबविण्यास मा. संचालक सिक्यरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांचे कडुन मणाई असतांना सुध्दा मोठया प्रमाणात ठेवी स्वीकारुन ठेवीची मुदत पुर्ण झाली असतांना सुध्दा विश्वासाने सोपविण्यात आलेल्या रकमेचा अपहार करुन ठेवीदारांना त्यांची रक्कम परतफेड न करता स्वत:चे फायदयाकरीता वापरुन कंपनीचे कार्यालय बंद करुन फिर्यादी व त्याचे परिचीत ठेवीदार यांची एकुन ५,९१,२७५/- रुपयाची व इतर ठेवीदारांची आर्थीक फसवणुक केली असल्याबाबत वरील नमुद फिर्यादी यांचे फिर्याद वरुन सुविधा फारमींग ॲन्ड अलाईड कंपणी शाखा गडचिरोली येथील संचालक तसेच कंपनीमधील मुख्य अभिकर्ता यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे नमुद विषयांकित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी त्यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक डी-२५/वाचक/गुन्हे तपास/हस्तांतरण/२०१७-१५१३ दिनांक २०.०७.२०१७ प्रमाणे सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली कडे वर्ग करण्यात आला आहे.

**सुविधा फारमींग ॲन्ड अलाईड कंपनीचे मुख्य संचालक तसेच इतर आरोपीतानी ९९ एजंटाचे माध्यमाने**

**एकुन ७९८४ गुंतवणुकदारांची एकुन १०,६३,४९,२३६/- रुपयांची आर्थीक फसवणुक केली असल्याचे तपासात** निष्पन्न झाले आहे. सुविधा कंपनी विरुध्द गुन्हा नोंद झाला असल्याबाबतची माहिती प्राप्त होताच संचालक तसेच नमुद अटक आरोपी हे पोलीस कारवाईचे भितीपोटि स्वगावी वास्तव्यास न राहात स्वत:चे अस्तीत्व लपवुन तसेच त्यांचे कडील जुने वापरते मोबाईल नंबर बदलवुन वेगवेगळया ठिकाणी वास्तव्य करीत असल्याने त्यांचा शोध घेवुन त्यांना अटक करण्यास विलंब झाला. परंतु वरील प्रमाणे नमुद आरोपीतांना दिनांक २९.०८.२०१९ रोजी दुर्ग (छ.ग.) येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली असुन, गुन्हयाचे तपासात पुरावा उपलब्ध करुन घेण्याकरीता आरोपीतांचा पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला आहे. तरी गडचिरोली जिल्हयातील गुंतवणुकदारांनी तपासात सहकार्य करावे.